MHAU120006052018

नियमित दिवाणी दावा क्र.– ६५/२०१८
दगडु वि. सुनिल

## निशाणी ५ खाली आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादी वा त्यांच्या तर्फे कुणीही अर्जाच्या परिच्छेद क्र. १ व २ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीत गुराढोरांचा मैला, उकीरडा टाकु नये व अतिक्रमण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशक्रम ३९ नियम १ व २ अन्वये दाखल केला आहे.

### वादीचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे आहे –

०२. मौजे बनोटी, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथील शेतजमीन गट नं. ९ एकुण क्षेत्रफळ १ हेक्टर ३३ आर की, ज्याच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे आहेत – पुर्वेस – नाला, पश्चिमेस – सरकारी रस्ता, उत्तरेस–शोभाबाई वीरभान, दक्षिणेस– ईश्वर रामकृष्ण यांची शेतजमीन आहे. (उपरोक्त मिळकतीस संक्षिप्ततेकरीता **'वादमिळकत'** असे संबोधण्यात येईल.)

०३. वादीचे असे कथन आहे की, वादमिळकत ही वादी यांची वडिलोपार्जित एकत्र हिंदु कुटुंबाची मालकी हक्काची मिळकत असुन ती सर्व वादी यांच्या सामाईक कब्जात आहे. वादी क्र. १ ते ४ हे बहिण भाऊ असुन वयोमानाने न्यायालयात वेळेवर हजर राहणे शक्य नसल्याने वादी क्र. ५ यांच्या हक्कात कुलमुख्त्यार पत्र करुन दिलेले आहे. वादी यांचे वडिल शहादु ओंकार पाटील मयत झाल्यानंतर वादी यांच्या सामाईक मालकीने वादमिळकतीला वारस म्हणुन नोंद झालेली आहे. वादमिळकतीच्या पश्चिम बाजुने रस्त्याला लागुन संपुर्ण घरे व गांव वस्ती आहे. प्रतिवादी क्र. १ ते १२ हे मौजे बनोटी येथील रहिवासी असुन ते वादमिळकतीच्या काही भागावर उकीरडा व गुराढोरांचा मैला टाकुन अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत आहे. प्रतिवादी हे वादी यांच्या समाजाचे असल्याने वादीने त्यांना वेळोवेळी वादमिळकतीत उकीरडा टाकु नये असे सांगितले असता, प्रतिवादी यांनी अरेरावीची भाषा वापरली. दि. २२.१०.२०१८ रोजी देखील वादींनी प्रतिवादींना समजावुन सांगितले असता प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे ऐकले नाही.

29/11/23

Scanned by CamScanner

सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**प्रतिवादींचा लेखी जबाब** –

**०४.** प्रतिवादी क्र. ८ ते ११ यांनी **नि.क्र.–२१** अन्वये लेखी जबाब दाखल केला आहे. इतर प्रतिवादींनी हाच लेखी जबाब **नि.क्र.–२२** वरील पुर्सिस अन्व्ये स्वीकारला आहे. सर्व प्रतिवादींचा दुरुस्ती लेखी जबाब **नि.क्र.–४३** अन्वये दाखल केलेला आहे. या लेखी जबाबाद्वारे प्रतिवादींनी अर्जातील सर्व कथन नाकारले आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादमिळकतीवर प्रतिवादींचा व इतरांचा त्यांच्या वाडवडिलांपासुन ताबा असुन सदर वादमिळकतीपैकी १ एकर क्षेत्रात वादी व प्रतिवादी यांच्या वाडवडिलांपासुन त्यांच्या भाऊबंधकीची स्मशानभुमी आहे. या स्मशानभुमीत वादी व प्रतिवादी यांच्या कुटुंबातील मयत झालेल्या लोकांवर अंत्यसंस्कार करण्यात येतो. सदर स्मशान भुमी ही पुर्वेकडील नाल्याकडुन आहे. सदर वादमिळकतीत इतर क्षेत्रावर प्रतिवादींचे व इतरांचे पत्र्याचे व काडीचे शेड असुन गुरे–ढोरे बांधण्यासाठी गोठा आहे. सदर वादमिळकत सन १९६७–६८ पासुन पडित आहे.

**०५.** वादमिळकत ही जुना सर्वे नं. १ चा पोटहिस्सा ५ चा बनलेला असुन सदर पोटहिस्सा हा वादींचे वडिल शहादु ओंकार व प्रतिवादींचे वाडवडिल व काही प्रतिवादींचे आजोबा, चुलत काका यांच्या एकत्रीत मालकीतील व ताब्यातील होता. जुना सर्वे नं.१ हा ३ एकर २० गुंठेचा असुन त्यात शहादु ओंकार यांचा २ आणे, वना सदा यांचा २ आणे, महारु चंद्रा यांचा २ आणे व फकीरा फुला यांचा २ आणे, तसेच परभत सोनजी यांचा ८ आणे हिस्स्याप्रमाणे मालकी हक्क होता व आहे. त्याबाबतची नोंदणी हक्क नोंदणी पत्रक पटलावर दाखल केले आहे. सन १९५५ ते १९६० पर्यंत वादमिळकतीच्या पिक पेरा सदरी शहादु ओंकार वगैरे सामाईक असाच उल्लेख आहे. नमुना नं. १ चे नोंदणी पत्रकात प्रत्येक कब्जेदार हा एक वर्षाच्या फेर पाळीने ही जमीन वाहतात असा मजकुर नमुद आहे. यावरुन वादमिळकत ही वादीच्या वडिलांच्या एकटयाच्या मालकीची नव्हती हे सिध्द होते. मात्र वादींनी केवळ शहादु ओंकार वगैरे सामाईक या मजकुराचा गैरफायदा घेवुन शहादु ओंकार मयत झाल्यानंतर बेकायदेशीरपणे केवळ शहादु ओंकारच्याच वारसाची खोटी व बेकायदेशीर नोंद करुन घेतली आहे. याबाबत माहिती प्रतिवादींना या दाव्यातील समन्सची बजावणी झाल्यानंतर झालेली आहे. प्रतिवादी हे वना सदा, महारु चंद्रा, फकीरा फुला व परभत सोनजी यांचे कायदेशीर वारस आहेत. आज ही प्रतिवादींचा

29/11/23

Scanned by CamScanner

देखील वादमिळकतीवर ताबा आहे. वादी केवळ सातबारा उतारा व फेरफार क्र. १६४८ चा गैरफायदा घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०६. वादी हा जोपर्यंत शहादु ओंकारचे नांव कशा पध्दतीने वादमिळकतीला नोंदवण्यात आले याचे कागदोपत्री पुरावे दाखल करत नाही तोपर्यंत वादमिळकतीचे वादी एकटेच मालक व ताबेदार आहेत हे सिध्द होत नाही. सन १९७२-७३ पर्यंत वादमिळकतीच्या सातबारा उता-यावर चापा गोबजी, नथ्थु तंगा, साहेबराव बापु म्हणजेच प्रतिवादी क्र. ११ चे वडिल व फकीरा फुला यांचे पिक पेरा सदर नांव अस्तीत्वात होते. वादीच्या वडिलांचे पिकपेरा सदरी सुध्दा शहादु ओंकार वगैरे व सामाईक असेच नांव येत होते. यावरुन देखील वादमिळकत ही वादींचे वडिल व प्रतिवादींचे वाडवडिलांची एकत्रीत सामाईक मिळकत होती हे सिध्द होते. उपरोक्त कारणांवरुन अर्ज फेटाळण्याची विनंती वादींनी केली.

**०७.** खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे -

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **०१.** | वादीच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे असे वादीने दाखविले आहे का? | **...नकारार्थी.** |
| **०२.** | वादीच्या बाजुने सोयीचा तोल आहे असे वादीने दाखविले आहे का? | **...नकारार्थी.** |
| **०३.** | वादीच्या बाजुने मनाई हुकुम न दिल्यास त्याचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादीने दाखविले आहे का? | **...नकारार्थी.** |
| **०४.** | काय आदेश? | **...अर्ज नामंजुर.** |

29/5/23

## कारणेमिमांसा

**०८.** वादीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री.डी.आर.सुर्यवंशी यांचा युक्तीवाद ऐकला.

Scanned by CamScanner

प्रतिवादी तर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. पी.एम.चौधरी यांचा युक्तीवाद ऐकला. पटलावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दे क्र.– १ ते ३ करीताः–</u>**

**०९.** उपरोक्त मुद्दयांचे निष्कर्ष एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रीत नोंदवली आहे. वादीचे असे कथन आहे की, वादमिळकत ही त्यांची वडिलोपार्जित हिंदु कुटुंबातील मिळकत आहे. वादी हे वादमिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. शहादु ओंकार हे वादीचे वडिल पुर्वी वादमिळकतीचे मालक व कब्जेदार होते. शहादु ओंकार मयत झाल्यानंतर फेरफार क्र. १६४८ अन्वये वादमिळकतीच्या सातबारा उता–यावर वादींच्या नावाची नोंद नोंदवण्यात आली. असे असतांनाही प्रतिवादी गुरा–ढोरांचा मैला व उकीरडा वादमिळकतीत टाकतात. तर, प्रतिवादींचे असे कथन आहे की, केवळ वादी वादमिळकतीचे मालक व ताबेदार नाही. वादमिळकतीत प्रतिवादींच्या वाडवडिलांचा देखील मालकी हक्क व कब्जा आहे. पुर्वीपासुन वादमिळकतीतील १ एकर क्षेत्र हे वादी, प्रतिवादी व खैरनार कुटुंबातील मयत झालेल्या लोकांवर अंत्यसंस्कार करण्याकरिता स्मशानभुमी म्हणुन वापरण्यात येत होती व आहे. वादमिळकतीचा जुना सर्वे नं. १ पोटहिस्सा ५ असुन नमुना नं. १ वर प्रतिवादींच्या वाडवडिलांच्या नावाने नोंदी असुन त्याप्रमाणे सन १९७२–७३ पर्यंत सातबारा उतारावरही नावे होती. तदनंतर, मात्र सदर क्षेत्र पडित म्हणुन नोंद आहे. सदर नोंदणी पत्रकात प्रत्येक कब्जेदार हा एक वर्षाच्या फेर पाळीने जमीन वाहील असा आशयाचा मजकुर देखील नमुद आहे. त्यामुळे केवळ वादी वादमिळकतीचे मालक व कब्जेदार नाही.

29/11/23

**१०.** उपरोक्त परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने केवळ वादी हाच वादमिळकतीचा मालक व कब्जेदार आहे काय हे पाहणे आवश्यक होईल. यासाठी, पटलावर दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करणे आवश्यक आहे. वादमिळकतीच्या सातबारा उता–याचे प्रमाणीत प्रतीचे व फेरफार क्र. १६४८ च्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फेरफार क्र.१६४८ अन्वये शहादु ओंकार मयत झाल्यानंतर वादीचे नांव वादमिळकतीच्या सातबारा उता–यावर नोंदवण्यात आलेले आहे. वादमिळकतीच्या नमुना नं. १ च्या प्रमाणित प्रतीचे अवलोकन केले असता त्यात प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे शहादु ओंकार, वना सदा, महारु चंद्रा, फकीरा फुला

Scanned by CamScanner

यांचा प्रत्येकी २ आणे हिस्सा तर परभत सोनजी यांचा ८ आणे हिस्सा आहे. त्याचप्रमाणे त्या नोंदणी पत्रकात इतर हक्कदार या सदरी प्रत्येक कब्जेदार एक वर्षाच्या फेरपाळीने ही जमीन वाहतात अशी देखील नोंद आहे. याचाच अर्थ असा की, केवळ वादी हाच वादमिळकतीचा एकमेव कब्जेदार नाही. तर, याउलट वादमिळकतीच्या एकुण क्षेत्रापैकी वादीच्या वडिलांना म्हणजेच शहादु ओंकार यांना केवळ २ आणे हिस्सा होता असे प्रथमदर्शनी दिसुन येते. वादमिळकतीच्या जुन्या सातबारा उता-यांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, कब्जेदार सदरी प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे इतर व्यक्तींची नावे नमुद आहेत. मान्यतः प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी हे एकाच समाजाचे आहेत. त्याचप्रमाणे साहेबराव बापु हे प्रतिवादी क्र. १ चे वडिल होते ही बाब देखील लेखी जबाबात नमुद आहे. याचाच अर्थ प्रतिवादी कथन करतात त्याप्रमाणे वादमिळकतीच्या कब्जेदार सदरी वादीच्या वडिलांसह प्रतिवादीचे वाडवडिल देखील कब्जेदार होते ही बाब प्रथमदर्शनी दिसुन येते.

**११.** प्रकरणातील अजुन महत्वाची बाब अशी की, प्रतिवादींनी त्यांच्या कथनाच्या पृष्टयर्थ वामन खैरनार व मधुकर शिंदे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यांच्या शपथ पत्राप्रमाणे वादमिळकतीचा काही भाग हा स्मशान भुमीकरीता वापरण्यात येतो असे नमुद आहे. त्याचप्रमाणे बनोटी येथील ग्रामपंचायत कार्यालयाने दिलेल्या प्रमाणपत्रात देखील वादमिळकतीत खैरनार पाटील या नागरिकांची स्मशानभुमी असुन तेथेच अंतिम संस्कार करण्यात येतात ही बाब नमुद आहे. यावरुन वादमिळकतीचा केवळ वादी एकटाच मालक व कब्जेदार नाही असे दिसुन येते. तसेच काही वादमिळकतीच्या सातबारा उता-यावरुन वादमिळकत पडित असल्याचे नमुद आहे. एकंदरीतच, या सर्व कागदपत्रांच्या अवलोकनावरुन केवळ वादी हा वादमिळकतीचा एकमेव कब्जेदार आहे असे म्हणता येणार नाही. सबब, प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने नाही. अशा परिस्थितीत तुर्तातुर्त मनाई हुकुम मंजुर केल्यास प्रतिवादींचेच नुकसान होणार आहे. उपरोक्त कारणांवरुन मी मुद्दे क्र. १ ते ३ निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

29/11/23

**<u>मुद्दा क्र.– ४ करीताः–</u>**

**१२.** वरील दिलेल्या कारणमिमांसेवरुन वादी हा तात्पुरता मनाई हुकम मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे –

Scanned by CamScanner

## <u>आदेश</u>

०१. वादीचा अर्ज निशाणी क्र. ५ हा खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

[आर.एन.पाठक]

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,

सोयगांव.

<u>दिनांक</u> : २९.११.२०२३.

Scanned by CamScanner